मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद न्यायालयाच्या मुख्य व विस्तार (Annex) इमारतीमध्ये ठेवण्याकरिता ०२ नग KIOSK Machines खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : संगणक- २०२६/प्र. क्र.३०/का. ७/ई-१६४३७२३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
**दिनांक : १४ मे, २०२६.**

**संदर्भ**

१. प्रबंधक (प्रशा.), मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे पत्र क्र. Adm./Comp./६२६८/२०२६, दि.२३.०४.२०२६.
२. विधि व न्याय विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२४/प्र.क्र.६६८/ई-८८२७२७/का.७, दि.०९.०४.२०२६.
३. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III, दि.०१.१२.२०१६.
४. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४, दि.२४.०८.२०१७, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४, दि.०८.१२.२०१७ व शासन निर्णय क्र. खादीग्रा-२०२१/प्र.क्र.३१/उद्योग-४, दि.०७.०३.२०२४.

**प्रस्तावना :-**

प्रबंधक (प्रशा.), मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे संदर्भ क्र.०१ येथील दि.२३.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये, यापूर्वी Kiosk Machines खरेदी संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई व मे. Borkar Polymers, Mumbai यांच्यात झालेल्या दरकरारानुसार, मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद न्यायालयाच्या मुख्य व विस्तार (Annex) इमारतीमध्ये वकील व याचिकाकर्त्यांना खटल्याची स्थितीच्या माहितीसाठी ०२ KIOSK Machines खरेदी करण्यास रु.६,७७,२२०/- (सर्व करांसह) इतका रकमेस प्रशासकीय मान्यता देवून निधी मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

यापूर्वी संदर्भ क्र.०२ येथील शासन निर्णय दि.०९.०४.२०२६ अन्वये जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये ५९१ नग Information Kiosk Machines खरेदी करण्यास रु.२०,०१,१८,५१०/- इतक्या रकमेच्या प्रस्तावास उच्चाधिकार समितीने दिलेल्या मान्यतेनुसार (तांत्रिक विनिर्देशासह) प्रशासकीय मान्यता दिली आहे. उक्त प्रस्तावामध्ये सादर केलेले Kiosk Machines चे तांत्रिक विनिर्देश हे उक्त प्रशासकीय मान्यता दिलेल्या Information Kiosk Machines च्या तांत्रिक विनिर्देशानुसारच आहे.

सदर प्रस्तावांतर्गत खर्च रु.१० लक्ष पेक्षा कमी असल्याने, संदर्भ क्र.०३ येथील शासन निर्णय दिनांक ०१.१२.२०१६ मधील सुधारित नियम पुस्तिकेतील मुद्दा क्र.२.९.२ नुसार “जर खरेदीचे अंदाजित मूल्य रुपये दहा लाखापेक्षा (रु.१० लाख) कमी असेल तर, विभाग प्रमुखांना खरेदीसंबंधी प्रशासकीय विभागीय खरेदी समितीची बैठक न बोलविता निर्णय घेण्याचा अधिकार आहे”. त्यानुसार सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद न्यायालयाच्या मुख्य व विस्तार (Annex) इमारतीमध्ये वकील व याचिकाकर्त्यांना खटल्याच्या स्थितीच्या माहितीसाठी ०२ नग KIOSK Machines खरेदी करण्यास अंदाजे रु.६,७७,२२०/- (सर्व करांसह) (अक्षरी रुपये सहा लक्ष सत्याहत्तर हजार दोनशे वीस फक्त) इतक्या रकमेच्या प्रस्तावास खालील अटी व शर्तीस अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. ०२ नग KIOSK Machines किंमतीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

| Sr.No. | Particular | Quantity | Price with including Taxes | Total (including Taxes) |
|---|---|---|---|---|
| 1. | KIOSK Machines with accessories & 5 years warranty | 02 | 3,38,610/- | 6,77,220/- |
| | | | **Tatal** | **6,77,220/-** |

३. **अटी व शर्ती:-**

१) सदर KIOSK Machines ची खरेदी प्रस्तावात नमूद केलेल्या तांत्रिक विनिर्देशानुसार, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या संदर्भ क्र.०४ येथील दि. २४/०८/२०१७ व ०८/१२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार, GeM प्रणालीवरुन शासनाच्या विहित पध्दतीने करण्यात यावी.

२) संदर्भ क्र.१ येथील प्रस्तावात नमूद केलेल्या तांत्रिक विनिर्देशाची KIOSK Machines GeM प्रणालीवर उपलब्ध नसल्यास, सदर मशिनची खरेदी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या संदर्भ क्र.४ येथील दि.०७.०३.२०२४ मधील परिच्छेद ५ मध्ये नमूद तरतुदीनुसार करण्यात यावी.

३) सदरची खरेदी करतांना उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या संदर्भ क्र.३ येथील दि.०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार, शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीच्या सुधारित नियम पुस्तिकेतील तरतुदींचे पालन करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखांची आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-१ उप विभाग-२ मधील अ. क्र. २७ (अ) नियम क्र. ७६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात

आलेल्या अधिकारानुसार त्याचप्रमाणे प्रधान सचिव व विधि परामर्शी तथा प्रशासकीय विभाग प्रमुख यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर प्रस्तावांतर्गत खर्च "मागणी क्र. जे-२, २०५२ सचिवालय सर्वसाधारण सेवा, (००) विधि व न्याय विभाग, (००) (०२) ई-गव्हर्नन्स प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी तरतूद (२०५२ ५११६) या लेखाशिर्षाखाली "१७ संगणक खर्च" या उदिष्टांतर्गत विहित पध्दतीने उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा.

६. यानुषंगाने, खरेदी प्रक्रिया करतांना प्राप्त एल१ नुसार निधी मागणीचा स्वतंत्र परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा. तदनंतर निधी वितरणाचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५१४१३५३२३७७१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHENDRA RAMCHANDRA JADHAV

Digitally signed by MAHENDRA RAMCHANDRA JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Law and Judiciary Department,
2.5.4.20=3971EC243F15CD8A25BFD6DBAF74EFE04F80D57C22E473EB8EAAC7AC344AC25A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=846337C71F3B3405F8D8448578B4ED3DDBE6ED2DB306E26977B3CDCCDDC27F14, cn=MAHENDRA RAMCHANDRA JADHAV
Date: 2026.05.14 13:54:21 +05'30'

**( महेंद्र जाधव )**
**विधि सल्लागार नि सहसचिव**

**प्रति,**

१ महाप्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई.
२ केंद्रिय प्रकल्प समन्वयक, ई कोर्ट प्रकल्प, मा. उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
३ प्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद.
४ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता),-१/ २, मुंबई/नागपूर.
५ महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, मुंबई/नागपूर.
६ अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७ अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुबई.
८ प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
९ संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१० संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
११ जिल्हा कोषागार अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
१२ कार्यासन अधिकारी, कार्या.- १३,२३ व २४, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३ निवड नस्ती -कार्या.७.